# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.05.2025** **वार- शुक्रवार**

---

**खेलो इंडिया**

खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्रानं 58 सुवर्ण, 47 रौप्य, 53 कास्य अशी
एकंदर 158 पदकांची लयलूट करत ‘स्पर्धे’त सलग तिसऱ्यांदा अव्वल स्थान मिळविलं. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व खेळाडू आणि सदस्यांचं अभिनंदन केलं आहे. या यशामुळे राज्याच्या क्रीडा क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी होत असल्याचं सांगत उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या पथकातील खेळाडू आणि सर्व सदस्यांचं अभिनंदन करत सर्व खेळाडूंना त्यांच्या उज्ज्वल कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**साखर**

देशातील साखर हंगाम संपला असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा उत्पादनात 18 टक्क्यांनी अर्थात 58 लाख टनांनी घट झाली आहे. यंदा 257 लाख टन साखरेचे उत्पादन झाले. गेल्यावर्षी हेच उत्पादन 315 लाख टन इतके झाले होते. सरासरी साखर उताऱ्यातही शून्य पूर्णांक 80 टक्क्यांनी घट होऊन यंदा केवळ 9 पूर्णांक 30 टक्के साखर उतारा मिळाला आहे. यंदा उत्तरप्रदेशाने महाराष्ट्राला मागे टाकत अव्वल क्रमांक पटकावत 92 लाख 80 हजार टन उत्पादन घेतले. महाराष्ट्रात 80 लाख 95 हजार टन उत्पादन झाले आहे. ऊसाची घटलेली उपलब्धता आणि साखर उताऱ्यातील घट यामुळे प्रत्यक्ष साखर उत्पादन कमी झाल्याची माहिती राष्ट्रीय साखर महासंघाने दिली आहे.मात्र देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेसा साठा असून येत्या हंगामात अनुकूल पावसाळी परिस्थिती तसच महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात वाढलेल्या ऊस लागणीमुळे साखर उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा असल्याचं महासंघानं म्हटलं आहे.

**महावितरण**

पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘राष्ट्रीय लोकअदालती’मध्ये पुणे विभागातील थकीत वीजदेयकांबाबत न्यायप्रविष्ट असलेली प्रकरणे

तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. यामध्ये सर्वाधिक रास्ता पेठ विभागातील 266 प्रकरणांचा , पुणे ग्रामीण विभागातील 42, गणेशखिंड विभागातील 33 प्रकरणे या लोकअदालतीत निकाली निघाली. तसेच दोन वीजचोरी प्रकरणांमध्ये वीजबिल आणि तडजोड शुल्कापोटी एकंदर 59 लाख 27 हजार रुपयांचा भरणा करण्यात आल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली.

**वाहतूक**

पुण्यामध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तीन लाख 22 हजार वाहनचालकांवर पुणे पोलिसांच्या वाहतूक शाखेने जानेवारी ते एप्रिल दरम्यान कारवाई केली. गेल्या वर्षी याच कालावधीत 75 हजार 713 बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली होती, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली आहे. विरुद्ध दिशेने वाहन चालवणे , दुचाकीवर तिघांचा प्रवास , मद्यप्राशन करून वाहन चालविणे, तसेच मोबाईलवर संभाषण करणे अशा प्रकारच्या वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

**चित्रपट महोत्सव**

'बहुरंग' पुणे आयोजित 18 व्या आंतरराष्ट्रीय आदिवासी चित्रपट महोत्सवाचे आयोजन येत्या 19 मे आणि 20 मे रोजी पुण्यातील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन इथं केल्याची माहिती बहुरंगचे अध्यक्ष डॉ. कुंडलिक केदारी यांनी दिली. 'शीरमोर' हे या महोत्सवाचे बोधचिन्ह आहे. जे माडिया गोंड नागरिक शिरस्त्राण म्हणून वापरत असलेल्या पारंपरिक वस्तूवर आधारित आहे. महोत्सवाचे उद्घाटन स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठाचे माजी कुलगुरू पंडित विद्यासागर यांच्या हस्ते होणार आहे.

**गुंतवणूकदार**

डी एस कुलकर्णी उद्योगात गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांच्या यादीत काही त्रुटी आढळल्या आहेत. काही गुंतवणूकदारांचा तपशील अपुरा आहे. या त्रुटी दूर करण्यासाठी 15 ते 29 मे दरम्यान शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात संबंधित गुंतवणूकदारांनी भेट द्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

**टेबल टेनिस**

पुणे टेबल टेनिस लीग सुपरलीग स्पर्धा आजपासून सुरू झाल्या आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत एकंदर सहा संघ असून प्रत्येक संघात आठ खेळाडू असतील. महिला, पुरुष, प्रौढ खेळाडू, 15 आणि 17 वर्षाखालील मुले आणि मुली या गटातील खेळाडूंचा समावेश राहणार आहे. नैशा रेवसकर, रोहित चौधरी, शौरेन सोमण, ईशान खांडेकर, समृद्धी कुलकर्णी, प्रणव घोलकर,संतोष वाकराडकर,

रुचिता दारवटकर या स्थानिक खेळाडूंबरोबरच नागपूर, ठाणे,मुंबई मधील नामांकित खेळाडू सहभागी होणार आहेत.

**कृषी उत्पन्न बाजार समिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या 2024-25 या आर्थिक वर्षाचे उत्पन्न वाढले असून ते 106 कोटी 18 लाख 52 हजार इतके झाले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हे उत्पन्न 12 कोटी 22 लाख रुपयांनी वाढले आहे. समितीला सेसद्वारे सर्वाधिक 79 कोटी 68 लाख 99 हजार उत्पन्न मिळालं आहे. दरवर्षी उत्पन्नात दहा टक्के वाढीचे उद्दिष्ट ठेवले असून यासाठी प्रत्येक महिन्याला आढावा बैठक आणि दप्तर तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे सभापती दिलीप काळभोर यांनी दिली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दुपारच्या सुमारास ढगांचा गडगडाट आणि जोरदार वाऱ्यासह पाऊस झाला. मध्यवर्ती भाग असलेल्या पेठांसह नजीकच्या डेक्कन, कर्वेनगर, शिवाजीनगर, औंध, बाणेर या उपनगरांमध्ये पावसानं जोरदार हजेरी लावली. तसंच येरवडा, लोहगाव, वाघोली आणि खराडी, हडपसर या भागांमध्ये काळे ढग दाटून आले आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह , नमस्कार.**